# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024

# महाराष्ट्राची राजकीय परंपरा व ऐतिहासिक पार्श्वभूमी पटवून देण्याची शिक्षकांची जबाबदारी : प्रा. पवार

▲ पाटण, दि. ९ : राष्ट्राच्या उभारणीत अनेकांनी पले आयुष्य वेचले आहे. राष्ट्र राज्याची स्थापना होऊन क वर्षे झाली असून कधी ई इतका महाराष्ट्र सैरभर झाला हे. महाराष्ट्राची राजकीय रा व ऐतिहासिक पार्श्वभूमी वून देण्याची जबाबदारी जच्या शिक्षकांवर आहे. तीयवाद, धर्मवाद, प्रांतवाद, वाद नसलेला महाराष्ट्र निर्माण ण्याचे यशवंतराव चव्हाण यांचे प्न होते. आजचे राजकारण यशवंतराव चव्हाण याच्या कीय प्रारूपच्या विरोधात हे. राजकारणात अर्थकारण ल्याची खंत शिवाजी द्यापीठाचे राज्यशात्र विभाग ख, राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार यांनी क्त केली.

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात कोयना एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, सारथीचे विलास पाटील, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी सुहास देशमुख, संचालक साहेबराव देशमुख, डॉ. प्रल्हाद चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, कृष्णराजे राजेमहाडिक, प्राचार्य शिरीष पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. पवार म्हणाले, सर्वांना बरोबर घेऊन जाणारी महाराष्ट्राची संस्कृती आहे. यशवंतराव चव्हाण यांची राजकीय परंपरा ही शिवकालीन आहे. महाराष्ट्राच्या परंपराची जाण असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे यशवंतराव चव्हाण होते. आजच्या राजकारणात वाईट आणि चांगले हे विद्यार्थ्यांना सांगण्याची जबाबदारी आजच्या शिक्षकांवर येऊन पोहचते आहे. महाराष्ट्राची संस्कृती घडविण्याची जबाबदारी तुम्हाला आणि मला करायची आहे तरच नवीन महाराष्ट्र घडेल.



मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. प्रकाश पवार, व्यासपीठावर अमरसिंह पाटणकर, सत्यजितसिंह पाटणकर, विलास पाटील व इतर. (सुरेश संकपाळ)

द्वितीय सत्रात सारथीचे विलास पाटील यांनी कार्यसंस्कृतीवर आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, कामात प्रेम निर्माण केले पाहिजे. काम हे केवळ मोबदला मिळण्याचे साधन नव्हे. आत्मसंतुष्टीकरिता करण्याची योगसाधना आहे. कामावर माणसाची ओळख होते. कर्तृत्वावरून माणूस ओळखतो. मधमाशी, पक्षी याची कार्यसंस्कृती घेण्यासारखी आहे. छत्रपती शिवाजी महाराज, मदर तेरेसा, प्रा. के. एस. अय्यर, राजाराम भापकर गुरुजी यांची कार्यसंस्कृती समाजाला प्रेरणा देणारी आहे. मुंबईच्या डबेवाल्यांचे व्यवस्थापन आणि पंढरपूरच्या वारीचे व्यवस्थापन मार्गदर्शक आहे. मूल्य, श्रद्धा, वर्तन याच्यात एकवाक्यता असते, तेव्हाच कार्यसंस्कृती निर्माण होते. मान्यता, प्रशंसा, प्रतिष्ठा कामातून प्राप्त होते. कर्म हेच यशस्वी जीवनाचे मर्म असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, शिक्षक हा समाजाचा आदर्श आहे. प्राचीन काळापासून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखालीच